सं.फौ.ख.क्रं. ७४/२०२३

| MHKO140004112023 | **<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्रं.७४/२०२३ नि नं. १ सोबत १६ संयुक्त</u>**<br>**<u>आदेश</u>**<br>न्यू नवहिंद सोसायटी<br>वि.<br>श्री. विलास शिवाजी घोळसे |
|---|---|

प्रस्तुतचा खटला हा पराक्रम्य अधिनियम १८८१ कलम १३८ अन्वयेचा आहे. नि. क्रं. १६ वरील पुरसीस व्दारे या प्रकरणातील फिर्यादी कळवितात की, या प्रकरणी त्यांची आरोपीशी तडजोड झाली असून आता ते यापुढे हे प्रकरण चालवण्यास इच्छूक नाहीत. फिर्यादीचे विधीज्ञ श्रीमती. सी. एस. पाटील हे फिर्यादी सोबत उपस्थित आहेत व ते फिर्यादीची ओळख पटवितात. खुद्द फिर्यादी समक्ष हजर राहून फिर्याद काढून घेत असल्यामुळे फिर्यादीची विनंती नाकारण्याची मुळीच प्रश्न उपस्थित होत नाही. त्यामुळे पुढील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

अपराधिक प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २५७ नुसार प्रस्तुतचे प्रकरण फिर्यादीने काढून घेतल्यामुळे निकाली काढण्यात येत आहे.

आरोपीची मुक्तता करण्यात येत आहे.

आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे.

नि.नं. १६ वरील पुरसीस नि. १ सोबत ठेवण्यात यावी.

यातील फिर्यादीस नियमानुसार न्यायालयीन मुद्राकांचा परतावा मिळण्याचा हक्क राहील.

सही/-

ठिकाण -चंदगड.

दि. ३०/०३/२०२६

**(व्ही. एस. अग्रवाल)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चंदगड